# कर संकलन विभागाचा पुन्हा एकदा नवा उच्चांक!

## महापालिकेच्या 41 वर्षांच्या इतिहासात प्रथमच कर संकलन विभागाचे 977 कोटींचे उत्पन्न

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाने 2023-24 या आर्थिक वर्षात तब्बल 977 कोटी 50 लाख रुपयांचा कर वसूल केला आहे. महापालिकेच्या 41 वर्षांच्या इतिहासात प्रथमच 1 हजार कोटींच्या जवळपास टप्पा गाठला आहे. हा कर संकलन विभागाचा एक माईलस्टोन ठरला आहे. 6 लाख 25 हजार मालमत्ता धारकांपैकी 5 लाख 11 हजार 154 मालमत्ता धारकांनी कराचा भरणा केला आहे. कर भरणा-या प्रामाणिक करदात्यांचे महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी आभार मानले आहेत.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या उत्पन्नाचा मालमत्ता कर प्रमुख स्त्रोत आहे. महापालिका हद्दीत 6 लाख 25 हजार मालमत्ता आहेत. यापैकी 5 लाख 11 हजार 154 मालमत्ता धारकांनी आपल्या कराचा भरणा केला आहे. कर संकलन व कर आकारणी विभागाने गतवर्षी 816 कोटींचा कर वसूल केला होता. यंदा तब्बल 161 कोटींचा अधिक कर वसूल करण्यात महापालिकेला यश आले आहे.

यंदा कर वसुलीसाठी महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख आणि त्यांच्या टीमने मोठ्या प्रमाणात मेहनत घेतली आहे.

गेल्या वर्षभरापासून थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करणे, नळ कनेक्शन खंडित करणे, बड्या थकबाकीदारांची नावे वर्तमान पत्रात नावे प्रसिद्ध करणे, मालमत्तांच्या लिलावाची प्रक्रिया, मीम्स, रिल्स सारखी अनोखी स्पर्धा, शहरात वर्दळीचे ठिकाण, मुख्य चौक, रस्ते इ. ठिकाणी होर्डींग्ज व फ्लेक्सद्वारे जाहिरात प्रसिद्धी, पॅम्पलेट वाटप, सोशल मिडीयाद्वारे चित्रफीत, लाऊडस्पिकरवर थकबाकीदारांच्या नावांची घोषणा करणे, जिंगलद्वारे जाहिरात प्रसिद्धी, कर संवाद अशा माध्यमातून करदात्या थकबाकीदारांमध्ये वेळोवेळी जनजागृती करण्यात केली. याचे फलित म्हणूनच एक हजार कोटींच्या जवळपास कर वसुल झाला आहे.

मालमत्ता कर वसुलीसाठी नागरीकांना मालमत्ता कराची बिल ऑनलाईन तसेच कर भरण्यासाठी ऑनलाईन व ऑफलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. मालमत्ताधारकांचे विविध घटकांसाठी ऑनलाईन व ऑफलाईन कर सवलत योजना, थकित कर वसुलीसाठी वेळोवेळी घरभेटी देणे, पत्र देणे, जप्तीपुर्व नोटीसा देण्याची कार्यवाही करण्यात आली.




### वाकड झोनमधून 154 कोटींचा उच्चांकी कर वसूल..

शहरात कर संकलनासाठी महापालिकेचे 17 झोन आहेत. यामध्ये वाकड झोनमध्ये सर्वाधिक म्हणजे 68 हजार मालमत्ता धारकांनी 154 कोटी 58 लाख रुपयांचा कर जमा केला आहे. त्याखालोखाल सांगवीत 51 हजार 718, चिखलीत 45 हजार 634, थेरगावमध्ये 45 हजार 434, चिंचवडमध्ये 43 हजार 286, मोशीत 34 हजार 980, भोसरीत 33 हजार 867 मालमत्ता धारकांनी कराचा भरणा झाला आहे. तर सर्वात कमी तळवडे झोनमध्ये फक्त 8 हजार527 मालमत्ता धारकांनी कर भरणा केला आहे.

### कर वसुलीचा वाढता आलेख..

2018-19 : 471 कोटी
2019-20 : 480 कोटी
2020-21 : 553 कोटी
2021-22 : 628 कोटी
2022-23 : 816 कोटी
2023-24 : 977 कोटी

### ऐतिहासिक बाबीं ठळकपणे..

- महापालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच 977 कोटींची मजल
- दोन हजारांपेक्षा जास्त मालमत्ता सील.
- विभागाच्या संपूर्ण सेवा ऑनलाईन.
- पहिल्यांदाच 87 टक्के चालू कर वसूल करण्यात यश
- 49.36 टक्के थकीत कर वसूल करण्यात यश

यंदा आम्ही एक हजार कोटींच्या लक्ष्याच्या अगदी जवळ पोचलो याचे समाधान आहे. मालमत्ताधारकांना मी यानिमित्त धन्यवाद देऊ इच्छितो. या वर्षी आम्ही प्रथमच सिद्धी प्रकल्पाच्या माध्यमातून बचत गट महिलांकडून बिले वाटप, डाटा अनालिसिस, जनजागृतीसाठी उत्तम क्रिएटिव्ह, सर्व सेवा ऑनलाईन करणे अशा विविध माध्यमातून नागरिकांना कर भरण्यासाठी प्रोत्साहित केले. त्याचाच हा परिणाम आहे. या कराचा विनियोग हे शहर उत्तम शाश्वत विकासाचे मॉडेल होण्यासाठीच वापरला जाईल. सन 2024-25 या वर्षात सर्वेक्षणातील सर्व नवीन मालमत्तांची कर आकारणी करणे, करविषयक सर्व अभिलेखांचे स्कॅनिंग, डीजिटायझेशन करून हा विभाग संपूर्णतः लोकाभिमुख होईल याचा प्रयत्न राहील. तसेच सर्व मालमत्तांच्या युपिक आयडी द्वारे महापालिकेच्या सर्व सेवा एकत्रित करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

**– शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

यंदा आम्ही प्रथमच मालमत्ता कर आणि पाणी पट्टी वसुली एकात्मिक पद्धतीने वसूल करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे मालमत्ता कर आणि पाणीपट्टी दोन्हींमध्ये भरघोस वाढ झाली आहे. तसेच मोठ्या प्रमाणावर हाती घेतलेली जप्ती मोहीम आणि यंदा जप्ती केलेल्या मालमत्तांची प्रथमच राबवलेली लिलाव प्रक्रिया याचाही कर संकलनाला उपयोग झाला आहे. यापुढेही जप्ती आणि लिलाव प्रक्रिया वर्षभर निरंतर स्वरूपात राबवण्यात येईल. नागरिकांनी त्यासाठी केलेल्या सहकार्याबद्दल आम्ही अत्यंत कृतज्ञ आहोत. यंदा आम्ही इतर शासकीय विभाग जसे की IGR, महावितरण यांच्या डेटाबेसबरोबर एकात्मिकरण करणार आहोत. त्यामुळे सेवेचा दर्जा वाढण्यास मदत होईल.

**– प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

माननीय आयुक्त यांचे कर संकलन विभागाचे व्हिजन आणि माननीय अतिरिक्त आयुक्त यांनी वेळोवेळी केलेले मार्गदर्शन यामुळे आम्ही हा टप्पा गाठू शकलेलो आहोत. येत्या वर्षभरात माननीय आयुक्त यांचे व्हिजन संपूर्णतः अंमलात आणण्याचा आमचा नम्र प्रयत्न राहील.

**– नीलेश देशमुख, सहायक आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

# वाहनचालकांविरुद्ध पोलिसांची मोहीम


## फॅन्सी नंबर प्लेट, काचेला काळी फीत लावणाऱ्या 406 वाहनांवर कारवाई

**पुणे | प्रतिनिधी**

हजारो रुपये खर्चून आकर्षक क्रमांक घ्यायचे आणि त्या क्रमांकाला फॅन्सी बनवून वाहनांना लावायचे. अशा फॅन्सी नंबर प्लेट लावलेली वाहने शहरात वावरताना दिसतात. त्यांच्या विरोधात कारवाई करण्याची मोहीम वाहतूक पोलिसांनी हाती घेतली आहे. 100 टक्के कारवाईचा आमचा वादा, असे आश्वासन देत वाहतूक पोलिसांनी ही कारवाई सुरू केली आहे.

फॅन्सी नंबर प्लेट, काचेला काळी फीत लावल्याप्रकरणी पिंपरी-चिंचवड वाहतूक पोलिसांनी वाकड परिसरात एकाच दिवशी ४०६ वाहनांवर कारवाई केली. वाकड आणि थेरगाव परिसरात केलेल्या कारवाईत चार लाख ३७ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

वाकड येथे एकूण ३०५ वाहनांच्या काळ्या काचा पोलिसांनी उतरवल्या आहेत. दंडात्मक कारवाई करण्यात आली. पहिल्यांदा कारवाई होत असल्यास ५०० रुपये दंड केला जातो. एकदा कारवाई करूनही काळ्या काचा काढल्या नाहीत, तर पुन्हा कारवाई करताना वाहनचालकावर १५०० रुपयांचा दंड केला जातो. वाकड येथील कारवाईत दोन लाख ५०० रुपयांचा दंड आकारण्यात आला. थेरगाव येथील पदमजी पेपर मिलसमोर कारवाई केली.




रस्त्यावर पार्किंग केलेल्या ४७ वाहनांवर कारवाई करून ५० हजार रुपयांचा दंड वसूल केला. शहरात सोनेरी रंगाची ऑडी मोटार घेऊन फिरणाऱ्या वाहनचालकावरही काचांना काळी फीत लावल्याप्रकरणी वाहतूक पोलिसांनी दंड आकारला. गाडीला हवा तो रंग द्या, पण काचेला काळी फीत, फॅन्सी नंबर प्लेट लावण्यापासून दूर राहण्याचे आवाहन पिंपरी-चिंचवड वाहतूक पोलिसांनी केले.

मोटार वाहन कायदा 1988 आणि केंद्रीय मोटार वाहन नियम 1989 नुसार वाहनांवर फॅन्सी नंबर प्लेट लावणे बेकायदेशीर आहे. अनेकजण 914 (नाद), 8181 (काका), 8055 (बॉस), 4141 (दादा), 4912 (पवार) अशा प्रकारचे आकर्षक नंबर घेऊन त्याचे एखादे नाव बनवून लावतात. यामुळे वाहतूक पोलिसांना संबंधित वाहनांवर कारवाई करणे, सीसीटीव्ही मध्ये वाहन ट्रेस करणे अवघड होते. वाहन क्रमांक ओळखता येत नसल्याने त्यातून अनेक अवैध प्रकार घडण्याची शक्यता असते.

वाहनांच्या नंबरप्लेटवरील क्रमांकामध्ये छेडछाड करून त्यावर 'आमदार', 'खासदार', 'नाना', 'दादा', 'भाई', 'पोलिस', 'प्रेस', 'आर्मी' असे शब्द लिहिणे आता महागात पडू शकते. कारण पोलिसांनी अशा बेशिस्त वाहनचालकांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. तसेच सायलेन्समध्ये छेडछाड करून कर्णकर्कश आवाज करणाऱ्या धूमस्टाइल दुचाकीस्वारांवरही पोलिसांची करडी नजर असणार आहे.

### मोटार साहित्य विक्रेते

सायलेन्सरमधून अचानक बंदुकीच्या फायरिंगसारखा आवाज आल्यानंतर दचकून अपघात होण्याची शक्यता असते. काही तरुणांकडून महाविद्यालयाच्या परिसरात मुलींची छेड काढण्याचे प्रकार सुरू असतात. अशा दुचाकीस्वारांसोबतच मेकॅनिक आणि विक्रेत्यांवर पोलिसांनी कठोर कारवाई करावी. तसेच, उन्हाळ्यात त्रास होऊ नये यासाठी मोटारीला नियमानुसार काळी फिल्म बसविली जाते. परंतु अशा मोटारचालकांवर सरसकट कारवाई करू नये.

### कठोर कारवाईची शक्यता...

ही कारवाई कठोर केल्यास वाहन चालकांचा वाहन चालवण्याचा परवाना काही दिवसांसाठी निलंबित देखील केला जाऊ शकतो. त्यासोबत अनेक वेळा कारवाई करूनही फॅन्सी नंबर प्लेट निघाली नाही तर वाहन जप्तीची देखील कारवाई होऊ शकते. इतरांपेक्षा आपण वेगळे, असे दाखवण्याचा मोह चांगलाच महागात पडणारा आहे. त्यामुळे नियमाप्रमाणे नंबर प्लेट लावून सहकार्य करावे, असे आवाहन वाहतूक विभागाकडून केले जात आहे.

# कोयता गँग पुन्हा सक्रिय : तरुणाला जीवे मारण्याची धमकी

## मार्केट यार्ड,आंबेडकरनगर परिसरात टोळक्याने कोयते, तलवारी उगारून दहशत

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यात कोयता गँगची दहशत थांबण्याचे नावच घेताना दिसत नाही. मागील काही दिवस कोयता गँगचा उपद्रव थांबल्याचे चित्र होते. मात्र कात्रज परिसरात कोयता गँगने पुन्हा एकावर हल्ला करण्यात आल्यामुळे खळबळ उडाली आहे. टोळीतील तिघा जणांनी एका तरुणाला टार्गेट केले आणि त्याच्यावर कोयत्याने प्राणघातक हल्ला केल्याचे उघडकीस आले आहे. सांस्कृतिक शहर अशी ओळख असलेल्या शहरात गुन्हेगारी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. त्यात कोयता गँगसारख्या गुन्हेगारी टोळ्यांनी घातलेला हैदोस रोखण्याचे मोठे आव्हान स्थानिक पोलिसांपुढे उभे ठाकले आहे.



मार्केट यार्ड भागातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरनगर परिसरात टोळक्याने कोयते, तलवारी उगारून दहशत माजविल्याची घटना घडली. टोळक्याने एका तरुणाला जीवे मारण्याची धमकी दिली. घराच्या दरवाज्यावर कोयते आपटून नागरिकांना शिवीगाळ केली. याप्रकरणी राहुल उर्फ लल्या कांबळे (वय १९), शुभम कांबळे (वय २०), डुई ताकतोडे (वय २१), जग्या (चौघे रा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरनगर, मार्केट यार्ड) यांच्यासह तीन ते चार साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

याबाबत अरशद इस्माइल बागवान (वय १९, रा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरनगर, मार्केट यार्ड) याने मार्केट यार्ड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. बागवानच्या भावाचा आरोपींशी वाद झाला होता. आरोपी रात्री बागवानच्या घराजवळ आले. त्यांनी तलवारी आणि कोयते उगारून दहशत माजविली. बागवानचे वडील, तसेच शेजारी राहणारे शालम शेख यांना कोयत्याचा धाक दाखविला. आम्ही आंबेडकरनगरचे दादा आहोत, अशी धमकी देऊन घराच्या दरवाज्यावर कोयते आपटून दहशत माजविली. पसार झालेल्या आरोपींचा शोध घेण्यात येत असून, सहायक पोलीस निरीक्षक मदन कांबळे तपास करत आहेत.

### वाहनांची तोडफोड...

» कोयता गँगच्या गुंडांनी येरवडा परिसरात उभ्या असलेल्या १० ते १२ वाहनांची तोडफोड केली. या घटनेने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे याप्रकरणी पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवत दोन जणांना अटक केली. अजय चित्रगुप्त बागरी आणि सुमित भारत सितापराव अशी अटक केलेल्या दोन आरोपींची नावे आहेत. त्यांच्यावर येरवडा आरोपींवर विविध कलमाअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. हे दोघे सोमवारी रात्री येरवडा परिसरात आले. त्यांनी रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना धमकावण्यास सुरुवात केली. या हल्लेखोरांच्या हातात कोयता तसेच हॉकी स्टिक होत्या. काही वेळानंतर त्यांनी भररस्त्यात धुमाकूळ घातला. तसेच परिसरात उभ्या असलेल्या १० ते १२ वाहनांची तोडफोड करून ते फरार झाले. मात्र येरवडा पोलिसांनी त्यांची धरपकड केली आहे.

# मावळातील जनता गद्दारांना थारा देणार नाही

## दापोडीतील कार्यकर्त्यांचा एल्गार : वाढती महागाई, टाळेबंदी ही भारतीयांसाठी सर्वात मोठी चिंता

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदार संघातील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांना लोकसभेत पाठवण्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रचारात उतरून गद्दारांना त्यांची जागा दाखवून उमेदवार वाघेरे पाटील यांना लोकसभेत पाठविण्याचा एल्गार यावेळी करण्यात आला. पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे हात बळकट करण्यासाठी कार्यकर्त्यांनी सोशल मिडीया, फेसबुक आणि जनसंपर्क याचा वापर करून तळागाळातील जनते पर्यंत पोहचून मावळचे शिलेदार संजोग वाघेरे पाटील याना लोकसभेत पाठविण्याचा मानस दापोडीकरांनी व्यक्त केला.

चिंचवड येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. विजयी गुलाल आपलाच असेल, अशी ग्वाही कार्यकर्त्यांनी दिली. या वेळी तुषार नवरे, अखिल शेख, शिवाजी काटे, वसंत काटे, राजेंद्र काटे, राजेंद्र भिकोबा घाटे, प्रशांत तुपे, अमोल जाधव, गोपाळ मोरे यांच्यासह दापोडीतील युवा कार्यकर्ते, ग्रामस्त, जेष्ठ नागरिक आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



सामाजिक कार्यकर्ते दिलीप गोते पाटील म्हणाले कि, शहरी भारतीय वाढत्या महागाई आणि नोकरीच्या सुरक्षेबद्दल चिंता आहे, ज्यात टाळेबंदीच्या भीतीचा समावेश आहे. त्यामुळे टाळेबंदी ही भारतीयांसाठी सर्वात मोठी चिंता आहे. शेतक-याँच्या उस, कांदा याला पाहिजे तसा भाव मिळत नाही देशतील शेतकरी हवालदिल झाला आहे. गेल्या २०१४ पासून या भाजपच्या काळात देशातील जनतेचे नुकसान झाले आहे. देश कर्जबाजारी झाला आहे. त्यामुळे या लोकसभेच्या निवडणुकीत जनता भाजपला घरी बसविल्याशिवाय शांत बसणार नाही. म्हणून 'भाजप हटाव, देश बचाव ' असा नारा दापोडीतील युवा कार्यकर्त्यांनी चिंचवड येथे या वेळी दिला.

यावेळी कार्यकर्त्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले कि, मावळ लोकसभा मतदारसंघात भारतीय जनता पक्षाने कितीही प्रयत्न केले तरी जनता मात्र आता गप्प बसणार नाही. गद्दार प्रवृत्तीच्या नेत्यांना निश्चितच थारा देणार नाही. मावळ लोकसभेत आजतागायत सर्वांगीण विकास झालेला नाही. गेला दहा वर्षात मावळच्या विकासाचे व्हिजनचे काय झाले. त्यामुळे गद्दार खासदार मावळच्या विकासात निष्क्रिय ठरले आहेत. महाराष्ट्रातील उद्योग परराज्यात जात आहेत, तरुणांना रोजगार नाहीये. बेरोजगारी वाढत आहे. त्यामुळे आई वडिलांचे संस्कार असलेल्या आणि समाजाशी नाळ असलेले समाजातील प्रत्येक घटका पर्यंत पोहचणारे आपला उमेदवार वाघेरे पाटील यांनाच प्रचंड बहुमताने विजयी करून मावळ लोकसभा मतदार संघात विजयाची पताका फडकवून, एकदिलाने काम करून त्यांना ऐतिहासिक विजय मिळवून देण्याची ग्वाही कार्यकर्त्यांनी दिली.

### शिवरायांच्या महाराष्ट्र ! इथे गद्दारांना थारा नाही !!

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे हात मजबूत करण्यासाठी मावळ लोकसभा मतदार संघाचे उमेदवार संजोग वाघेरे यांना लोसभेत पाठवून गद्दारांना घरी बसवू असा इशारा दापोडीतील कार्यकर्त्यांनी दिला. महाराष्ट्रातील जनतेला "पन्नास खोके एकदम ओके" हे कळायला लागले आहे. आता लोक मावळ लोकसभा मतदार संघात यांना योग्य उत्तर देतील, असे कार्यकर्त्यांनी सांगितले. या आढावा बैठकीत झालेली गर्दी हीच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या विजयाची नांदी आहे. त्यामुळेच शिवरायांच्या महाराष्ट्र! इथे गद्दारांना थारा नाही !! अशी रोखठोक भूमिका कार्यकर्त्यांनी मांडली.

---

## संजोग वाघेरेंच्या गावभेट दौऱ्यास प्रचंड प्रतिसाद

### मावळ लोकसभेसाठी शहरी भागात मतदारांचा वाढता पाठिंबा

**पिंपरी| प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघात शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या पिंपळे निलख गावभेट दौऱ्यास प्रचंड प्रतिसाद मिळाला. आमचं ठरलंय, असं म्हणत मावळ लोकसभेसाठी शहरी भागात मतदारांचा वाढता पाठिंबा मिळत आहे.



ठिकठिकाणी माता-भगिनींकडून संजोग वाघेरे पाटलांचे औक्षण करून स्वागत केले जात होते. “जय भवानी, जय शिवाजी” या घोषणांनी अक्षरशः परिसर दणाणून गेला होता. वाघेरे पाटील यांनी चालत चालत नागरिकांच्या गाठी-भेटी घेत होते. मतदारांकडून शुभेच्छांचा स्वीकार करीत संजोग वाघेरे पाटील मनापासून विचारपूस करत होते. कडाक्याच्या उन्हाळा असूनही कार्यकर्त्यांच्या उत्साहात भरच पडत होती. वाघेरे पाटील यांना मावळ लोकसभेत पाठवण्याचा निर्धार येथील नागरिकांकडून केला जात आहे.

पिंपळे निलख येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष तुषार कामठे, संतोष साठे, शिरीष साठे, पवन कामठे, नितीन इंगवले, प्रकाश बालवडकर, सचिन साठे, पृथ्वीराज साठे, भूषण इंगवले तसेच विशाल नगर येथील दिलीप बालवडकर, नंदू बालवडकर, आरती चौंधे, पवन कामठे, काळूराम नांडगुदे, पांडुरंग थोपटे, संकेत चौंधें, रवी साठे, अनिल संचेती, भुलेश्वर नांदगुडे, गणेश काटे, संदीप कामठे, महेश इंगवले, संकेत जगताप, मिरा कदम, संदीप कामठे, प्रदीप जगताप, शोभा नानी जगताप, माणिक भांडे, दौलत कामठे, संजय साठे, भाऊसाहेब बडगे, दिनेश टकले, सागर साठे, ज्ञानेश्वर मुरकुटे यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ, जेष्ठ नागरिक, युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## महापालिकेचा अग्निशमन विभाग होणार सक्षम

### अग्निशमन विभागात 150 फायरमनची सरळसेवेने भरती

**पिंपरी| प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराचा दिवसेंदिवस विस्तार होत असताना लोकवस्त्या आणि औद्योगिक भागात सातत्याने लहान-मोठ्या आगीच्या घटना घडत आहेत. मात्र, अग्निशमन केंद्रांची संख्या आणि मनुष्यबळ अपुरे असल्याने आगीच्या घटनांवर नियंत्रण आणताना अडचणी येतात. यासाठी अग्निशमन विभागात 150 फायरमनची सरळसेवेने भरती करण्यात येणार आहे.



शहराची लोकसंख्या सुमारे 30 लाखांच्या घरात आहे. शहरात झोपडपट्ट्यांबरोबरच दाट लोकवस्तीचा भाग मोठ्या प्रमाणात आहे. टोलेजंग इमारती उभ्या राहत आहेत. मोठ्या संख्येने औद्योगिक तसेच आयटी कंपन्या सुरू झाल्या आहेत. नियमाप्रमाणे लोकसंख्येनुसार शहरामध्ये 18 अग्निशमन केंद्रे असणे गरजेचे आहे. मात्र, सद्य:स्थितीत शहरात केवळ 8 केंद्रे आहेत. लोकसंख्या वाढत असताना अग्निशमन विभागात अपुरे मनुष्यबळ असल्याने त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात ताण येत आहे. अग्निशमन विभागात प्रशासकीय कामकाजामधील अधिकारी, कर्मचारी वगळता 6 लिडिंग फायरमन तर फक्त 30 फायरमन कार्यरत आहेत. भविष्यात पिंपरीत मध्यवर्ती केंद्रासह 10 केंद्राची उभारणी करण्यात येणार आहे. त्यामुळे मनुष्यबळाची आणखी गरज आहे.

अग्निशमन विभागात कर्मचारी संख्या वाढविण्याच्या दृष्टीने महापालिकेने तयार केलेल्या आकृतीबंधानुसार 191 पदांची भरती करण्यात येणार आहे. त्यानुसार यामध्ये 150 फायरमन, 10 सब ऑफिसर, 6 स्टेशन ऑफिसर, 15 यंत्र चालक, 10 लिडिंग फायरमन अशा 191 पदांची सरळ सेवेने भरती करण्याचे अग्निशमन विभागाचे भविष्यात नियोजन आहे. पहिल्या टप्प्यात महापालिकेच्या स्थायी आस्थापनेवरील ड संवर्गातील अग्निशमन विमोचन, फायरमन रेस्क्युअर हि 150 रिक्त पदे सरळसेवेने भरती करण्यात येणार आहे. पात्र उमेदवारांकडून ऑनलाइन पध्दतीने अर्ज मागविले आहेत. या भरतीची सविस्तर माहिती महापालिकेच्या संकेतस्थळावर पाहण्यास उपलब्ध करून देण्यात आली आहे.

# आरोग्यमंत्री सावंत यांच्याकडून घोटाळा

## आरोग्य विभागात साडेसहा हजार कोटींचा घोटाळा झाला : रोहित पवार यांचा आरोप

**पुणे | प्रतिनिधी**

आरोग्य विभागात साडेसहा हजार कोटींचा घोटाळा झाला, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवारांनी केला.

आदिवासी, मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या दूध, भोजनात भ्रष्टाचार करणाऱ्या सरकारमधील मंत्र्यांनी लोकांचा जीव वाचवणाऱ्या रुग्णवाहिकामध्ये भ्रष्टाचार करण्याचे सोडले नाही. आरोग्य विभागाने रुग्णवाहिका पुरवठा करणाऱ्या सुमित व बीव्हीजी या कंपनीला नियमबाह्य पद्धतीने टेंडर देण्यात आले. आरोग्यमंत्री तानाजी सावंत आरोग्य विभागातील भ्रष्टाचार संबंधी गंभीर आरोप केले.

आरोग्य विभागात साडेसहा हजार कोटींचा घोटाळा झाला, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवारांनी केला. तर अँब्यूलन्स खरेदीत 539 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला, असे म्हणत त्यांनी तानाजी सावंत यांच्या राजीनाम्याची मागणी केली पुण्यात घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी हा आरोप केला. यावेळी जिवंत खेकडा दाखवला हा खेकडा आरोग्य विभागाला पोखरणाऱ्या खेकड्याचा प्रतीक असल्याचं रोहित पवार म्हणाले. रोहित पवारांनी केला आरोग्य विभागात साडेसहा हजार कोटींचा घोटाळा असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवारांनी केला.

539 कोटी रुपये अँब्यूलन्सच्या खरेदीच्या नावाखाली खात्याल आले. सुमीत फॅसिलिटी ही पिंपरी चिंचवडची कंपनी होती. या कंपनीला अँब्यूलन्स चालविण्याचा अनुभव नव्हता. मात्र तरीही मुख्यमंत्री दावोसला गेल्यावर एका स्पॅनिश कंपनीसोबत या सुमेत कंपनीचा करार करण्यात आला. मात्र त्यानंतर बी व्ही जी या कंपनीने हे कंत्राट त्यांना मिळावे म्हणून प्रयत्न सुरु केले. त्यानंतर बी व्ही जी चा देखील समावेश या कंत्राटात करण्यात आला, असंही ते म्हणाले. त्यानंतर त्यांनी आरोग्यमंत्र्याच्या राजीनाम्याची मागणीदेखील केली.



पुढे बोलताना ते म्हणाले की, एका बाजुला बी व्ही जी बाबत अनेक तक्रारी आहेत, अनेक राज्यांत बी व्ही जी ब्लॅक लिस्ट कंपनी आहे. मात्र तरीही या कंपनीला कंत्राट देण्यात आले. स्पॅनिश कंपनी ब्लॅक लिस्ट आहे .सुमित कंपनीने या कंत्राटासाठीचे निकष ठरवले आणि त्यानंतर स्वतःच टेंडर भरले. काही दिवसांनी बी व्ही जी ला सहभागी करून घेतले, असे अनेक आरोप त्यांनी केले आहेत. मी या मुद्द्यावर मी आरोग्य मंत्र्यांशी जाहीर चर्चा करायला तयार असल्याचं ते म्हणाले. शिवाय या भ्रष्टाचाराचा पैसा निवडणुकीत वापरण्यात येणार आहे, असा आरोपही त्यांनी केला.

तानाजी सावंत यांनी " खेकड्याने पोखरल्याने धरणांना गळती लागते" असे विधान केले होते, या विधानावरून पवार यांनी सावंत यांना धारेवर धरले. पवार म्हणाले, " सावंत यांच्याकडून रुग्णवाहिका प्रकरणात साडे सहा हजार कोटी रुपयांचा घोटाळा केला आहे.खेकडा वळवळ करतो. धरण पोखरतो. बिळात जावून बसतो. लोकांचं लक्ष कमी झालं की पुन्हा बाहेर येतो. खेकडा महाराष्ट्राला पोखरतोय."

### रोहित पवार नेमकं काय म्हणाले?

» रोहित पवार आरोग्य विभागात साडेसहा हजार कोटींचा घोटाळा झाला याला आरोग्य मंत्री जबाबदार आहेतच एक तर त्यांनी त्यांची खुर्ची सोडावी त्यांचे पद सोडावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. ही फाईल पुढे पास कशी केली. देवेंद्र फडणवीस साहेबांकडे ही फाईल जाते. त्यांमी दुर्लक्ष केलं का? साडेसहा हजार कोटीचा भ्रष्टाचार झालेला आहे कोण जबाबदार आहे? असा प्रश्न आमच्या सगळ्यांचा आहे, असं ते म्हणाले.

# पिण्याच्या पाणी टंचाईची तीव्रता वाढली

## उन्हाळ्याची तीव्रता वाढल्याने सोसायट्यांमध्ये टँकरच्या फेऱ्या वाढल्या

**पिंपरी | प्रतिनिधी**

उन्हाळ्याची तीव्रता वाढल्याने गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये खासगी टँकरच्या फेऱ्या वाढल्या आहेत. महापालिकेच्या टँकरची संख्या आता बाराशेपर्यंत पोहचली असून, त्यात आणखी वाढ होत आहे.

गेल्यावर्षी कमी प्रमाणात पाऊस झाला. त्याचा परिणाम खडकवासला धरण साखळीमधील पाणीसाठ्यावर झाला आहे. फेब्रुवारी-मार्चपासूनच उपनगरांमध्ये पाणी टंचाई जाणवत आहे. समाविष्ट गावांमध्येही पाण्याची समस्या गंभीर झाली आहे. पुरेशा प्रमाणात वेळेवर पाणी उपलब्ध होत नाही. त्यामुळे नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

### १२०० टँकरद्वारे पाणीपुरवठा

उन्हाळ्याची तीव्रता वाढल्याने पाणीपुरवठा विभागाकडे टँकरची मागणी वाढली आहे. आत्तापर्यंत शहरातील विविध भागांत ११०० टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात होता. महापालिकेने फेब्रुवारीपासून आणखी १०० ते १२५ टँकर वाढविले आहेत. टँकरमधील पाणी महापालिकेच्या पाण्याच्या टाक्या, विहीर, ग्रामपंचायतींच्या जलवाहिन्यांद्वारे पोचविले जात आहे. उन्हाची तीव्रता वाढल्यास महापालिकेला आणखी टँकर वाढवावे लागणार असल्याची चिन्हे आहेत.

### पाणी टंचाईची कारणे

असमान पाणीपुरवठा,मोठ्या प्रमाणात पाणी गळती,जलवाहिन्यांची अपुरी कामे,देखभाल-दुरुस्ती, बिघाड,मोठ्या सोसायट्यांमध्ये दिवसेंदिवस होणारी वाढ

### समाविष्ट गावांमध्ये गंभीर स्थिती

सुस, नऱ्हे, आंबेगाव, धायरी, उंड्री, पिसोळी, शेवाळवाडी, मांजरीसह समाविष्ट गावांमधील पाण्याची स्थिती गंभीर होत चालली आहे. जानेवारी-फेब्रुवारीपर्यंत किमान दिवसाआड पाणी मिळत होते.



आता नागरिकांना दोन-तीन दिवस पाण्याची वाट पहावी लागत आहे. महापालिकेचे टँकर वेळेवर येत नाहीत. त्यामुळे नागरिकांना खासगी टँकरशिवाय पर्याय राहिलेला नाही. महापालिकेकडून समाविष्ट गावांना सोई-सुविधांप्रमाणेच पाणी देण्यातही हात आखडता घेतला जात असल्याची नागरिकांची तक्रार आहे. शहरात नियमित पाणीपुरवठा सुरू आहे. काही भागांमध्ये पाण्याची समस्या असून, तेथे महापालिकेकडून टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. पाण्याची मागणी वाढत असल्याने आणखी टँकर वाढवावे लागतील.

उन्हाच्या झळा वाढल्याने पाण्याच्या टँकरची मागणीही वाढत आहे. सध्या महापालिकेकडून एक हजार ते बाराशे टँकर पुरविले जातात.

### अशी आहे सद्यःस्थिती...

महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून शहरात नियमित पाणीपुरवठा केला जात असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, मध्यवर्ती पेठांसह उपनगरांचा काही भाग वगळता बहुतांश ठिकाणी पाण्याची समस्या जाणवत आहे. बालेवाडी, सुसपासून ते कात्रज, जांभूळवाडी, उंड्री, पिसोळी, हडपसर, मांजरी, लोहगाव, विश्रांतवाडीपर्यंत नागरिकांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे. काही भागात दररोज दोन ते तीन तास पाणी मिळत आहे.तर काही उपनगरांत दिवसाआड किंवा दोन ते तीन दिवसांनी पाणीपुरवठा केला जात आहे. गृहनिर्माण सोसायट्यांकडूनही टँकरची मागणी वाढली आहे. वाडी, गावठाण, ग्रामपंचायतींना महापालिकेच्या टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे.